Reg. No. NP CITY/236/2018-20

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक ४६] गुरुवार ते बुधवार, नोव्हेंबर १८-२४, २०२१/कार्तिक २७-अग्रहायण ३, शके १९४३ [पृष्ठे ७, किंमत : रुपये ३०.००

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

# भाग एक—नागपूर विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **भाग एक-शासकीय अधिसूचना :** नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार–अ, चार-ब व चार–क यांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | नाही. |
| **संकीर्ण अधिसूचना :** नेमणुका इ. इ., केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | १-७ |
| **भाग एक-अ.—**(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | १-४ |

## शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

नाही.

## संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (ना.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. १३३६.

**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), यांजकडून**

**भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ कलम १९(१) अन्वये—**

क्रमांक कलि-उजि(भू)-पें.प्र-कावि-५२४-२०२१.—

ज्याअर्थी, समूचित शासन असलेल्या नागपूर जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम "असा केला आहे.) याच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या आलेल्या अधिकारांचा वापर करुन अधिसूचना क्रमांक कलि-उजि(भू)-पे.प्र-कावि-३७५-२०२०, दिनांक १९ ऑगस्ट २०२१ अन्वये प्रारंभीक अधिसूचना काढण्यात आलेली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की,यासोबत जोडलेल्या अनुसूची एकमध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या गावठाणा मधील जमीनीची अनुसूची दोनमध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, नागपूर जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने, कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त गावठाणाची जमीन संपादीत करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटलेली आहे.

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त गावठाणच्या जमीनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटूंबीयांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी पुनर्वसाहत क्षेत्र म्हणून निर्धारीत केले असल्याचे याद्वारे घोषित केले असून पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-याची कार्ये पार पाडण्यासाठी श्रीमती हेमा बडे, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), पेंच प्रकल्प, नागपूर यास पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची-एक

## जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक २८-अ-६५-२०१८-२०१९, प.ह.नं. ७२, गाव सुमठाणा, ता. हिंगणा, जिल्हा नागपूर.

| अनुक्रमांक | सर्व्हे क्र. किंवा गट क्रमांक | संपादनाखालील क्षेत्र (अदमासे) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर/चौ. मी. |
| १ | ३७/१ | ०.१४०७ |
| २ | ३७/२ | ०.१४८ |
| ३ | ५१ | ०.२४०५ |
| ४ | ३८/१ | ०.३८२३ |
| ५ | ३८/२ | ०.०७ |
| | एकूण . . | ०.९८१५ |

## अनुसूची-दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

| | |
|---|---|
| प्रकल्पाचे नाव | :– मिहान प्रकल्प. |
| प्रकल्प कार्याचे वर्णन | :– मौजा सुमठाणा, तालुका हिंगणा, जिल्हा नागपूर येथील खाजगी जमीन सुमठाणा-कोतेवाडा-सोंडापार-परसोडी-जामठा या मंजूर सुधार योजनेतील २४.०० मिटर रुंद रस्त्याचे बांधकामासाठी. |
| समाजाला मिळणारे लाभ | :– सदर रस्ता तयार झाल्यामुळे वाहनाचे आवागमन/नागरिकांना जाणेयेणे सोईचे होईल. तसेच रस्त्यामुळे क्षेत्रातील विकास कामे जलद गतीने होणेसाठी. |

## अनुसूची-तीन

## बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे

विस्थापित होत नाही.

## अनुसूची-चार

## पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र विमानतळ विकास कं. मर्या., नागपूर यांचे पत्र क्रमांक ११०९-मिहान-Land-२०१९, दिनांक २० फेब्रुवारी २०१९.

**टीप :–**उक्त जमिनीच्या नकाशाचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), पेंच प्रकल्प, नागपूर यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

**हेमा बडे,**

नागपूर :
दिनांक १० नोव्हेंबर २०२१.

उपजिल्हाधिकारी,
(भूसंपादन), पेंच प्रकल्प, नागपूर.

भाग १ (ना.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. १३३७.

## उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, यांजकडून

**भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ कलम ११(१) अन्वये—**

क्रमांक कावि-उविअ-भुसंपा-गो.प्र.-अ.का.-७६८-२०२१.—

ज्याअर्थी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या (खंड) (ई) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, काढण्यात आलेली शासकीय अधिसुचना, महसुल व वन विभाग क्रमांक संकीर्ण दिनांक ११/२०१४/प्र.क्र. ७७/अ-२ दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम-३ च्या खंड (झेड-अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा जास्त नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनूसार समूचित शासन असलेल्या, चंद्रपूर जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यास यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनाकरीता (यात यापुढे ज्याचा निर्देश "सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोनमध्ये दिलेले आहे.

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोटकलम (१) च्या तरतुदीन्वये असे अधिसूचीत करण्यात येते की उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भुमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची-तीनमध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमुद करावी.)

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची-चारमध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कलम-४३ च्या पोट कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल, यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाचमध्ये दिलेला आहे. (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर या अनुसूचीमध्ये तपशिल नमुद करावा.)

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पुर्ण होईल त्या कालावधीपर्यंत जमीनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमीनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यास जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमुद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु, आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम -११ च्या पोट कलम (५) अनुसार जिल्हाधिकारी, भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम-२०१४ (यापुढे ज्यांच्या निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम-१० च्या उप नियम (३) द्वारे विहीत केल्याप्रमाणे भुमीअभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि म्हणून त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम-३ च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, मूल, जि. चंद्रपूर, यांस पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची-एक**

**जमिनीचे वर्णन**

भूसंपादन प्रकरण क्रमांक २४/एल-६५/२०२१-२०२२, गाव पाथरी, ता. सावली, जिल्हा चंद्रपूर.

| अ. क्र. | सर्व्हे क्र. किंवा गट क्र. | ७/१२ प्रमाणे एकूण क्षेत्र | संपादनाखालील क्षेत्र (अंदाजे) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | हे. आर | हे. आर |
| १ | ६३३ | ० ५६ | ० ०१ |
| २ | ६३४ | १ ५९ | ० ०१ |
| ३ | ६४३ | ० ७१ | ० ०१ |
| ४ | ६२९ | ० ९० | ० ०१ |
| | एकूण . . | ३ ७६ | |

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाचे विवरण**

प्रकल्पाचे नाव :– गोसीखुर्द प्रकल्प

प्रकल्प कार्याचे वर्णन :– आसोलामेंढा मुख्य कालव्यावरील सा. क्र. ८९० मी. वरुन निघणा-या पाथरी लघुकालवा क्र. १ कालव्यावरील पाथरी लघुकालव्याच्या बांधकामाकरिता.

**अनुसूची-तीन**

**बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे**

विस्थापित होत नाही.

**अनुसूची-चार**

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या अभिकरणाने दिलेल्या) सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश :– गोसीखुर्द प्रकल्प, महाराष्ट्र यास भारत सरकार पर्यावरण एंव वन मंत्रालय, नई दिल्ली यांचे पत्र क्रमांक No-J-11016 (7)/84-EN.5/1A, दिनांक ३ फेब्रुवारी १९८८ नुसार पर्यावरण आघात निर्धारण झालेले असल्यामुळे सामाजिक आघात निर्धारण बाबतची तरतूद लागू होत नाही.

**अनुसूची-पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल**

अ. प्रशासक म्हणून नियुक्त करण्यास आलेल्या अधिका-याचे पदनाम :– निरंक

ब. प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता :– निरंक

क. ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली त्या अधिसूचनेचा तपशिल :– निरंक

**एम. खेडकर,**
उपविभागीय अधिकारी तथा
भूसंपादन अधिकारी,
मूल.

मूल :
दिनांक ११ ऑक्टोबर २०२१.

भाग १ (ना.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. १३३८.

## उपविभागीय अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी, यांजकडून

**भूमी संपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ कलम ११(१) अन्वये—**

क्रमांक कार्या-शिरस्तेदार-कावि-२८८५-२०२१.—

ज्याअर्थी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) च्या कलम ३ मधील पोट-कलम (३) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र शासनाने महसुल व वन विभाग अधिसूचना क्रमांक एमआयएस-११-२०१४-सीआर-७७-अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे ज्याचा निर्देश " सदहु अधिसूचना " संबोधण्यात यावे) अन्वये सार्वजनिक प्रयोजनार्थ जमीन संपादन करताना सदहु कायद्याच्या कलम ३ मधील पोट-कलम (झेड अ) नुसार जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा जास्त नसलेल्या जमिनीच्या बाबतीत त्या जिल्हयाचा जिल्हाधिकारी यांना या कायद्याअंतर्गत जमीन संपादन करण्यास शासनाच्या वतीने समुचित शासन म्हणून घोषीत करण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी, या अधिसूचनेनूसार जिल्हाधिकारी यांना शासनाच्या वतीने समूचित शासन म्हणून घोषीत करण्यात आले आहे त्याअर्थी अनुसूची-एकमध्ये दर्शविलेल्या जमिनी (यापुढे याचा उल्लेख "उक्त भूमी" असा करण्यात येईल.) अनुसूची-दोनमध्ये नमूद केलेल्या सार्वजनिक प्रयोजनाकरीता आवश्यक आहे किंवा आवश्यक असल्याचा संभव आहे. (यापुढे याचा उल्लेख "उक्त सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात येईल.) याबाबत जिल्हाधिकारी गडचिरोली यांची समुचित शासन म्हणून खात्री झाल्यामुळे सदहु कायद्याच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) नुसार सार्वजनिक कामाचे प्रयोजनासाठी जमीन संपादन करण्यात येते असे अधिसूचित करणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, सदहु भूमी संपादन कायद्यानुसार सार्वजनिक प्रयोजनार्थ भूमी संपादित करताना भूधारकास विस्थापित करण्याचे कारण सोबत जोडलेल्या अनुसूची-तीनमध्ये नमूद केलेले आहे.

आणि ज्याअर्थी, भूमी संपादन कायद्यांतर्गत सार्वजनिक प्रयोजनार्थ भूमी संपादन करताना सामाजिक परिणाम निर्धारणाचा सारांश सोबत जोडलेल्या अनुसूची-चारमध्ये नमूद केलेला आहे.

आणि ज्याअर्थी, भूमी संपादन कायद्याचे कलम ४३ च्या पोट कलम (१) नुसार विस्थापितांचे पुनर्वसन व पुनर्स्थापना करण्याकरिता सोबत जोडलेल्या अनुसूची-पाचमध्ये प्रशासकाचे विवरण नमूद केलेल आहे. (प्रशासकाची नियुक्ती आवश्यक असल्यास अनुसूची पाचमध्ये माहिती देणे आवश्यक आहे.)

त्याअर्थी, सदहु कलम ११ चे पोट-कलम (४) नुसार अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून सदहु भूमी संपादन कायद्याच्या प्रकरण ४ खाली कार्यवाही पुर्ण होईपर्यंत कोणतीही व्यक्ती उक्त जमिनीचा अथवा जमीनीचा भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा कोणताही व्यवहार करविणार नाही किंवा अश्या जमीनीवर कोणताही बोजा निर्माण करणार नाही.

परंतु, जिल्हाधिकारी, अशा प्रकारे अधिसूचित केलेल्या भूमीच्या मालकाने अर्ज केल्यावर लेखी नोंदवावयाच्या विशेष परिस्थितीमध्ये या पोट-कलमाच्या अंमलबजावणी मधून अशा भूमी मालकास सूट देऊ शकेल.

परंतु, आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे जाणीवपूर्वक उल्लंघन केल्यामुळे तिला सोसाव्या लागलेल्या कोणत्याही नुकसानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकारीद्वारे भरपाई देण्यात येणार नाही.

पुन्हा असे घोषीत करण्यात येते की, सदहु भूमी संपादन कायद्याचे कलम ११ च्या पोट कलम (५) अन्वये जिल्हाधिकारी, भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त नियम" असा करण्यात येईल.) चे नियम १० उप नियम (३) अन्वये भुमी अभिलेख अद्ययावत करण्याचे काम हाती घेतील.

त्याअर्थी, आता, समुचित शासन म्हणून जिल्हाधिकारी, सदर्हु कायद्याचे कलम ३ पोट-कलम (ग) अन्वये उपविभागीय अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी, गडचिरोली यांना कर्तव्ये पार पाडण्यास प्राधिकृत केलेले आहे.

**अनुसूची-एक**

**संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन**

गावाचे नाव-येवली, ता. जि. गडचिरोली, त. सा. क्र. १९.

| अ. क्र. | सर्व्हे क्रमांक | एकूण क्षेत्र | संपादनाखालील क्षेत्र |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | हे. आर | हे. आर |
| १ | ४०१ | ० ७८ | ० ३० |
| २ | ७३४ | ० २३ | ० १९ |
| ३ | ४४३ | १ २३ | ० ३५ |
| ४ | ६०८ | ० २० | ० ०५ |

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाचे विवरण**

प्रकल्पाचे नाव :– चिचडोह बॅरेज प्रकल्प.

प्रकल्प कामाचे विवरण :– पूर्ण संचय पातळीवर बुडीत क्षेत्राकरीता.

प्रकल्पाचे समाजाला होणारे फायदे :– स्थानिक शेतकरी यांना शेतीकरीता पाण्याचा लाभ होणार आहे.

**अनुसूची-तीन**

**प्रकल्प बाधितांना विस्थापित करणे आवश्यक असल्याबाबतची कारणे**

प्रकल्पाने भूधारक विस्थापित होत नाही.

-निरंक-

**अनुसूची-चार**

**सामाजिक परिणाम निर्धारणाचा सारांश** :–१. मा. जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचे पत्र क्र. कार्या-८-अ.का.-भूसंपादन-कावि-७०७-२०२१, दिनांक १४ जुलै २०२१.

२. कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, चंद्रपूर यांचे पत्र क्र. जा.क्र. १३९६-चिंशा-भू.सं.-चिचडोह-२०२१, दिनांक ११ जून २०२१.

**अनुसूची-पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

अ. अधिका-याचे नाव, पदनाम :– उपविभागीय अधिकारी, तथा विशेष भूसंपादन अधिकारी, गडचिरोली.

ब. अधिका-याचा कार्यालयीन पत्ता :– बस स्टॅन्ड समोर, धानोरा रोड, गडचिरोली.

क. ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली त्या अधिसूचनेचे विस्तृत विवरण :– निरंक

संपादनामुळे भूधारक विस्थापित होत नाही त्यामुळे त्यांना विस्थापनाचा लाभ देता येणार नाही. महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९८६ व तद्नंतर या प्रकल्पाबाबत निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णयानुसार लाभ देण्यात येतील.

**टीप :- १.** उक्त जमिनीचा आराखडा उपविभागीय अधिकारी कार्यालय, गडचिरोली कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

**२.** याबाबत काही आक्षेप असल्यास या कार्यालयाचे समक्ष लेखी आक्षेप अधिसूचना प्रसिद्ध झाल्यापासून ६० दिवसाचे आत सादर करावे.

**आशिष येरेकर** (भा.प्र.से.),
उपविभागीय अधिकारी तथा
विशेष भूसंपादन अधिकारी, गडचिरोली.

गडचिरोली :
दिनांक १० नोव्हेंबर २०२१.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.